0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि., मुंबई यांचेकडून दि. २६/०९/२०११ रोजीच्या पत्रासोबत प्राप्त झालेले कागदपत्र.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल /६-अ/कावि/प्र.क्र.६७/२०११/ जा.८००, दि.०५/१०/२०११ व दि.१४/१०/२०११.

३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांचे दिनांक ११/१०/२०११ व १८/१०/२०११ रोजीचे लेखी अभिवेदन.

४) पारख अग्रो इंडस्ट्रीज लि. चे व्यवस्थापक विजय बी. गांधी यांचे दि.११/१०/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

५) मो/लॉरी क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ चे मालक अन्सार अहमद अब्दुल नबी कुरेशी, कुंदन अशोक हुलावळे, मो/लॉरी क्र.एमएच-०४-सीअे-९७२२ चे मालक योगेश शिवाजी ताटे यांचे टपालामार्फत प्राप्त दि.१४/१०/२०११ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदन.

६) मो/लॉरी क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ चे चालक संदिप रामचंद्र कदम, चंद्रकांत गोविंद खापरे व मो/लॉरी क्र.एमएच-०४-सीअे-९७२२ चे मालक योगेश शिवाजी ताटे यांचे टपालामार्फत प्राप्त दि.१८/१०/२०११ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदन.

७) मे.अथेना ट्रेड विन्ड्स प्रा.लि. यांचे टपालामार्फत प्राप्त दि.१७/१०/२०११ व दि.०१/११/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

८) व्ही. अर्जुन, क्लिअरींग ॲण्ड फारवर्डींग एजंट यांचे टपालामार्फत प्राप्त दि.१८/१०/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६७/२०११/जा. ८२९
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.
दिनांक :- १६ /११/२०११

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २०/०९/२०११ रोजी सायंकाळी १९:३० वाजताचे सुमारास गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबईचे सहा. पोलिस आयुक्त, श्री. फिरोज पटेल यांना अशी माहिती मिळाली की, काही मोटार लॉरी चालक व इतर काही इसम हे सी. डब्ल्यू. सी. गोडावून कॉटनग्रीन, मुंबई येथे कॅनडा येथून आयात झालेला सफेद वटाणा हा ट्रकमध्ये भरुन

तळोजा, नवी मुंबई येथे जात असताना वर नमूद विभागातील घोडपदेव क्रॉस रोड नं. ३ ई.एस.एल. पाटणवाला मार्ग, मुंबई २७ या ठिकाणी कुंदन नावाच्या इसमास ट्रकमध्ये भरलेल्या मालापैकी काही मालाचा अपहार करुन तो संगनमत करुन विक्री करतात. मिळालेल्या विश्वसनिय माहितीच्या अनुषंगाने गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई येथील पथक पंचासह पायी चालत क्रॉस रोड नं. ३, ई.एस.एल. पाटणवाला मार्ग, ग्लोबल पॅकर्स ॲण्ड मुव्हर्सच्या समोर रोडवर, मुंबई २७ चे समोर जावून पोहचले. सदर रोडवर दोन मो/लॉरी क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ व मो/लॉरी क्र. एमएच-०४-सीओ-९७२२ उत्तरभिमुख उभ्या असल्याचे दिसून आल्या. सदर मो/लॉऱ्याच्या चालकाच्या मदतीने काही इसम सफेद रंगाच्या प्लॅस्टिकच्या भरलेल्या गोणी खाली उतरवून बाजूस असणाऱ्या पत्राच्या शेडमध्ये ठेवत असताना दिसले. सदर गोडावून पश्चिमभिमुख दरवाज्यात एक इसम उभा असून तो सदरचा माल उतरवून घेऊन गोडावूनमध्ये असलेल्या इसमास थप्पी लावून ठेवण्यास सांगत होता. सदरवेळी अधिकाऱ्यांनी त्यास त्याची कृती थांबविण्यास सांगितली.

त्यानंतर गोडावूनच्या दरवाज्याजवळ उभा असलेल्या इसमास त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव कुंदन अशोक हुलावळे असे सांगून तो स्वत: गोडावूनचा मालक असल्याचे सांगितले. तसेच मो/लॉरी चालक हे मालामध्ये तफावत करुन काही वटाण्याने भरलेल्या गोण्या त्यास कमी भावाने स्वत:च्या फायद्यासाठी विकतात.

त्याप्रमाणे सदरचा वाटाणा हा तो गोडावूनमध्ये साठा करुन बाजारात चढ्या भावाने विक्री करतो असे मान्य केल्याने त्यास ताब्यात घेण्यात आले. तसेच त्याच्या सांगण्यावरुन ट्रकमधून वटाण्याच्या भरलेल्या गोण्या उतरुन घेऊन गोडावूनमध्ये ठेवत असलेल्या त्यांचे साक्षीदार इसमाचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव चंद्रकांत गोविंद खापरे असे सांगितले, म्हणून त्यास सुध्दा ताब्यात घेतले.

त्यानंतर मो/लॉरी क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ मध्ये पाठीमागील फाळक्याच्या आत मध्ये उभा राहून वाटाणा गोणी उतरविणारा इसमास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव संदीप रामचंद्र कदम असे सांगून तो सदर मो/लॉरीचा चालक असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे वर नमूद मो/लॉरीच्या पाठीमागेच उभी असणारी मो/लॉरी क्र.एमएच-०४-सीओ-९७२२ चे पाठीमागील फाळक्याच्या आत उभ्या असलेल्या व वाटाण्याच्या गोणी उतरवून देण्याऱ्या इसमास सुध्दा त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव नसीम पीरमंहमद खान असे सांगून तो सुध्दा सदर लॉरीचा चालक असल्याचे सांगितले.

वरील चारही इसमांना पोलिसांनी ताब्यात घेऊन एकत्र गोडावून समोर थांबवून ठेवले. सदर गोडावून व उभ्या असलेल्या रोडवरील मो/ट्रकची पाहाणी केली असता वाटाण्याच्या भरलेल्या एकावर एक रचून थप्पी लावून ठेवलेल्या गोण्या दिसून आल्या.

RATIONING & DIREC... OFFICE ...UMBAI

पंचनाम्या अंतर्गत गोडावूनमधील मालाबाबत गोडावून मालक कुंदन अशोक हुलावळे यास वाटाणा साठवणूक केल्याबाबतचे परवाना व कागदपत्रे यांची विचारणा केली असता, त्याने कोणतीही कागदपत्रे नसल्याचे सांगितले.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितानी आपआपसात संगनमत करुन मे. अमीत कर्मशियल कंपनी यांनी प्रकाश अग्रो इंडस्ट्रीज तलोजा, नवी मुंबई यांना पाठविलेल्या मालाचा स्वत:च्या फायद्यासाठी अपहार केला. तसेच कंपनीने माल पोहचविण्याची जबाबदारी सोपविली असता यातील आरोपीतांनी तसे न करता कंपनीच्या अन्यायाने विश्वासघात करुन सदरचा मालाचा अपहार केला व तो कुंदन नावाच्या इसमाने कमी दराने विकत घेऊन विनापरवाना चढ्या भावाने विक्री करण्यासाठी साठा करुन ठेवला. पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्याची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द [१] जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ [२] महाराष्ट्र शेडयुल कमोडिटीज रिटेल डिलर्स लायसंन्सिग ऑर्डर, १९७९ चे कलम ३ तसेच [३] भा. द. वि. चे कलम ४०७, ४११, ३४ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द भायखळा पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १९९/२०११, दि.२१/०९/२०११ (गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १३/२०११) अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | पांढरा वाटाणा भरलेल्या एकूण १४० पांढऱ्या रंगाच्या प्लॅस्टिकच्या गोण्या प्रत्येकी ५० किलो वजनाच्या | ७००० किलो | १,७५,०००/- |
| २ | एक जुना वापरता लाल रंगाचा वेगवेगळया मापाच्या वजना सहित वजनकाटा | १ नग | ७,०००/- |
| ३ | एक जुनी वापरती सफेद व लाल रंगाची मो/लॉरी क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ | १ नग | १०,००,०००/- |
| ४ | पांढरा वाटाणा भरलेल्या एकूण १८० पांढऱ्या रंगाच्या प्लॅस्टिकच्या गोण्या प्रत्येकी ५० किलो वजनाच्या | ९००० किलो | २,२५,०००/- |
| ५ | एक जुनी वापरती लाल रंगाची मो/लॉरी क्र. एमएच-०४-सीजे-९७२२ | १ नग | १०,००,०००/- |
| ६ | पांढरा वाटाणा भरलेल्या एकूण ३१७ पांढऱ्या रंगाच्या प्लॅस्टिकच्या गोण्या प्रत्येकी ५० किलो वजनाच्या | १५८५० किलो | ३,९६,२५०/- |
| ७ | अमित कर्मशियल कंपनीचे इम्पोर्ट पल्सेस बोरकर यांच्या नावे असलेले वेगवेगळे दोन चलान बील | - | - |
| | | एकूण | २८,०३,२५०/- |

सबब, उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. ११/१०/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दि. ११/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उप निरिक्षक श्री. के. आर. सावंत हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ३ अन्वये त्यांचे लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस पारख अग्रो इंडस्ट्रिस लि. चे व्यवस्थापक विजय बी. गांधी हे उपस्थित होते व त्यांनी वाचावे क्र. ४ अन्वये त्यांचे लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस मे. अमीत कमर्शियल कंपनीचे मॅनेजर जगदीश हरजी मंगे, मो/लॉरी क्र.एमएच-०४-सीओ-९७२२ चे मालक योगेश शिवाजी ताटे, मो/लॉरी क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ चे मालक अन्सार अहमद अब्दुल नबी कुरेशी, मो/लॉरी क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ चे चालक संदीप रामचंद्र कदम व कुंदन अशोक हुलावळे हे उपस्थित होते. मो/लॉरी क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ चे मालक अन्सार अहमद अब्दुल नबी कुरेशी, कुंदन अशोक हुलावळे, मो/लॉरी क्र.एमएच-०४-सीओ-९७२२ चे मालक योगेश शिवाजी ताटे यांनी टपालामार्फत त्यांचे वाचावे क्र. ५ अन्वये लेखी निवेदन सादर केले. इतर आरोपी /अपचारी सदर सुनावणीस उपस्थित नव्हते.

दि. ११/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित पारख अग्रो इंडस्ट्रिस लि. चे व्यवस्थापक विजय बी. गांधी यांनी कंपनीच्या वतीने सादर केलेल्या निवेदनात, दि. २०/९/२०११ रोजी जप्त करण्यात आलेला वाटाणा त्यांनी मे.अमित कर्माशिअल कंपनी यांचेमार्फत मे.अथेना ट्रेड मिल्स् प्रा.लि. या आयातदार कंपनीकडून ५० मेट्रीक टन वाटाण्याचा सौदा केल्याचे सांगून त्यातील २२ मेट्रीक टन वाटाणा दि. १९/२/२०११ रोजी त्यांना कंपनीमार्फत देण्यात आल्याचे सांगितले. तसेच सुनावणीच्या दरम्यान कंपनीचे व्यवस्थापक यांनी सदर वाटाण्याचा साठा हा सदर आयातदार कंपनीमार्फत आयात केलेला असून नमुना दाखल बिल क्र.०५०५, दि. १९/९/२०११, बिल क्र. २५६, दि. २१/९/२०११, बिल क्र.२४८, दि. २०/९/२०११ व बिल क्र. २४९, दि. २०/९/२०११ च्या छायांकीत प्रती सादर केल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरणी गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांनी घटनास्थळी घेतलेल्या जबाबामध्ये अशी माहिती मिळाली की, मो/लॉरी क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ व मो/लॉरी क्र. एमएच-०४-सीओ-९७२२ मधील जप्त वाटाण्याचा साठा हा मे. अमित कर्मशिअल कंपनी यांनी मे. पारख ॲग्रो इंडस्ट्रीज लि. यांना वितरीत करण्यासाठी सी. डब्ल्यू. सी.

गोडावून, कॉटनग्रीन, मुंबई गोदामातून भरुन घेतला आहे. मे. पारख ॲग्रो इंडस्ट्रीज लि. यांनी दि. ११/१०/२०११ रोजीच्या सुनावणीमध्ये सादर केलेल्या लेखी निवेदनात सदरचा साठा मे.अथेना ट्रेड विन्ड्स प्रा.लि. यांनी सी. डब्ल्यू. सी. गोडावून, कॉटनग्रीन, मुंबई गोदामात साठवणूक केल्याचे सिद्ध झाले आहे.

सबब, मे.अथेना ट्रेड विन्ड्स प्रा.लि. यांना तसेच व्यवस्थापक, सी. डब्ल्यू. सी. गोडावून, कॉटनग्रीन, मुंबई यांना तसेच इतर आरोपी/अपचारी यांना त्यांचे म्हणणे सादर करण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १८/१०/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १८/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस श्री. एम.एस. पठाण सहा. पोलिस निरिक्षक यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस मे.अथेना ट्रेड विन्ड्स प्रा.लि.चे व्यवस्थापक फ्लोड गॅब्रीयन हे उपस्थित राहिले व त्यांनी कंपनीच्या वतीने वाचावे क्र. ७ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस श्री. झुनेद प्रधान मे. ए. टु. झेड लॉजिस्टिक कंपनीचे मालक उपस्थित राहिले व त्यांनी मे. व्ही अर्जून यांचे वाचावे क्र. ८ अन्वये लेखी निवेदन सादर केले.

मो/लॉरी क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ चे चालक संदिप रामचंद्र कदम, चंद्रकांत गोविंद खापरे व मो/लॉरी क्र.एमएच-०४-सीअे-९७२२ चे मालक योगेश शिवाजी ताटे यांनी त्यांचे चालक नसीम पिर महम्मद खान यांच्या वतीने टपालामार्फत वाचावे क्र. ६ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदन सादर केले.

सबब, प्रकरण गुणवत्तेनुसार निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

**युक्तिवाद :-**

दिनांक ११/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उप निरिक्षक श्री. के. आर. सावंत यांनी युक्तीवाद केला की, संदर गुन्ह्यात जप्त केलेला माल हा सफेद वटाणा असून तो एकूण १४० गोणी असून त्यापैकी ५३ गोणी माल अपहार झालेला आहे. गुन्ह्यात जप्त केलेल्या दोन्ही मो/लॉऱ्या व त्यामधील अपहार होवून शिल्लक राहिलेला माल एकूण ४९७ गोणी असून त्या मालाचे कागदपत्र संबंधितांकडे मिळून आल्याने सदरच्या लॉऱ्या व माल संबंधितांस परत करण्यास पोलिसांची हरकत नाही. एकूण ५३ गोणी अपहार झालेल्या असून त्या पारख ॲग्रो इंडस्ट्रीज कंपनीच्या मालकीच्या असल्याने त्या गोणी कंपनीस अथवा माल पाठविण्याऱ्या भोला ट्रान्सपोर्ट कंपनीस परत करण्यास पोलिसांची हरकत नाही. गुन्ह्यातील अटक आरोपी नामे कुंदन अशोक हुलावळे यांचे कब्जात मिळालेल्या ८७ गोणी व निवेदन पंचनाम्या अन्वये हस्तगत केलेल्या २६ गोणी अशा एकूण ११३ गोणी बाबत कोणतेही कागदपत्र मिळून न आल्याने तसेच अपहार झाल्याची तक्रार संबंधितांकडून

प्राप्त न झाल्याने तसेच सदरचा माल हा नाशवंत असल्याने त्याचे विल्हेवाटीबाबत आदेश होण्यास विनंती आहे, असे सांगून तसे लेखी अभिवेदन सादर केले.

दिनांक ११/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित पारख अग्रो इंडस्ट्रिस लि. चे व्यवस्थापक विजय बी. गांधी यांनी युक्तीवाद केला की, त्यांची तळोजा एल-७३, एमआयडीसी ह्या ठिकाणी वाटाणा दाल/पीठ बनविण्याची कंपनी आहे. सोबत माहिती साठी PDL/FDL चे अनुज्ञप्तीची प्रत जोडत आहोत. कंपनीमध्ये दररोज १५० मे.ट. मिलींग होत असते. कारणे दाखवा नोटीसमध्ये नमूद केलेल्या घटनेशी त्यांचा दुरान्वये संबंध नाही. मुंबईमधील व्यापाऱ्याकडून आयात केलेला वाटाणा खरेदी करुन तो ट्रान्सपोर्टमार्फत कंपनीत आणला जातो. दि.१५/०९/२०११ रोजी त्यांनी दलाल मे. अमीत कमर्शियल कं. ह्याच्या मार्फत मे. अथेना ट्रेडविंग्ज प्रा.लि. ह्यांच्याशी ५० मे.ट. वाटाणाचा सौदा केलेला आहे. यातील साधारण २२ मे.ट. वाटाणा १९/२१ रोजी कंपनीमध्ये ट्रान्सपोर्ट मार्फत आलेला आहे व बाकीचा माल एमएच-०४-जीपी-४३९५ व एमएच-०४-सीअे-९७२२ मध्ये भरला होता. सदर गाडीतील माल हा कंपनीच्या मालकीचा असून तो त्यांना देण्यात यावा, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

मो/लॉरी क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ चे मालक अन्सार अहमद अब्दुल नबी कुरेशी यांनी दिनांक १४/१०/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी निवेदनात, तो एक ट्रान्सपोर्टर असून त्याची गाडी क्र. एमएच-०४-सीपी-४३९५ या गुन्ह्याखाली पकडण्यात आली आहे. त्याचा पारख अग्रो या कंपनी जवळ वाहतूक करणेचा करार झाला असून त्या नुसार तो त्याचा व्यवसाय करीत आहे. सदर गुन्ह्याशी त्याचा प्रत्यक्ष संबंध नसून केवळ वाहतुकीकरीता त्याचा ट्रक उपलब्ध असल्यामुळे सदर गुन्ह्यात समावेश करण्यात आलेला आहे. तरी त्याचा वरील नमूद केलेला ट्रक मुक्त करण्यात यावा अशी विनंती आहे, असे नमूद केले आहे.

कुंदन अशोक हुलावळे यांनी दिनांक १४/१०/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी निवेदनात, तो एक सर्वसामान्य नागरीक असुन या प्रकरणाशी त्याचा काही एक संबंध नाही. सदरहू तो तेथे असलेल्या लाकडाच्या वखारीत गेला असता त्याला काही सुचना न करता सदर गुन्ह्याखाली अटक करण्यात आली. तरी त्याचा या गुन्ह्याशी काही एक संबंध नाही, असे नमूद केले आहे.

मो/लॉरी क्र.एमएच-०४-सीअे-९७२२ चे मालक योगेश शिवाजी ताटे यांनी दिनांक १४/१०/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी निवेदनात, तो एक ट्रान्सपोर्टर असून त्याची गाडी क्र. एमएच-०४-सीअे-९७२२ या गुन्ह्याखाली पकडण्यात आली आहे. त्याचा पारख अग्रो या कंपनी जवळ वाहतूक करणेचा करार झाला असून त्या नुसार तो त्याचा व्यवसाय करीत आहे. सदर गुन्ह्याशी त्याचा प्रत्यक्ष संबंध नसून केवळ वाहतुकीकरीता त्याचा

ट्रक उपलब्ध असल्यामुळे सदर गुन्ह्यात समावेश करण्यात आलेला आहे. तरी त्याचा वरील नमूद केलेला ट्रक मुक्त करण्यात यावा अशी विनंती आहे, असे नमूद केले आहे.

दिनांक १८/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित श्री. एम.एस. पठाण सहा. पोलिस निरिक्षक यांनी सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, सर्व प्रतिवादी यांची गुन्ह्याच्या पुढील तपासाच्या अनुषंगाने पुराव्या करीता सविस्तर जबाब नोंद करण्यात आलेला आहे. सदर जबाबाच्या वेळी ते कार्यरत असलेल्या मे. अथेना ट्रेड विन्डस् प्रा. लि. सी ३१२, ३ रा माळा क्रिस्टल प्लाझा लोखंडवाडा अन्फीनेंट मॉलसमोर, लिंक रोड, अंधेरी (प), मुंबई - ५४ या कंपनीने कॅनडा या देशातून सफेद वाटाणा आयात करीत असून तो भारतात गरजू कंपन्यांना बोर्कर्स् मार्फत विक्री करीत आहे. त्या प्रमाणे दि.२०/१०/२०११ रोजी त्यांचे बोर्कर अमित कमर्शियल कंपनी कॉटनग्रीन यांनी पारख अग्रो इंडस्ट्रीज प्रा.लि. तळोजा यांना दोन लॉरी मधून माल पाठविलेला होता. त्या मालाचे पेमेंट त्यांना दि.१०/१०/२०११ रोजी किंमत रुपये ६,१६,१५९/- धनादेश क्र. ००१९३३ चा त्यांच्या कंपनीच्या खात्यावर जमा झाला. म्हणून त्यांनी सदर बोर्कर मार्फत तळोजा येथील कंपनीस मालाची डिलव्हरी केली. सदर गुन्ह्यातील जप्त करण्यात आलेला माल हा यातील अटक आरोपीतांनी एकमेकांशी संगणमत करुन अपहार केलेला आहे. तसेच सदरचा माल हा नाशवंत असल्याकारणाने त्याचे विल्हेवाटीचे आदेश जारी होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

मो/लॉरी क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ चे चालक संदिप रामचंद्र कदम यांनी दिनांक १८/१०/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी निवेदनात, तो गाडी क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ या गाडीचा चालक आहे. सदर गुन्ह्यात त्याला सीबी कंट्रोल (गुन्हे शाखा) यांनी अटक केली आहे. परंतू त्याचा या गुन्ह्याशी काहीही संबंध नाही, असे नमूद केले आहे.

चंद्रकांत गोविंद खापरे यांनी दिनांक १८/१०/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी निवेदनात, तो एक सर्वसामान्य नागरीक असून या प्रकरणाशी त्याचा काही एक संबंध नाही. सदरहू तो तेथे असलेल्या लाकडाच्या वखारीत काम करतो. ते वखारीसमोर उभा असतांना सदर गुन्ह्यात त्याला काही एक सुचना न देता पकडण्यात आले. त्याचा या गुन्ह्याशी काही एक संबंध नाही, असे नमूद केले आहे.

मो/लॉरी क्र.एमएच-०४-सीअे-९७२२ चे मालक योगेश शिवाजी ताटे यांनी दिनांक १८/१०/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी निवेदनात, त्याचा गाडी क्र.एमएच-०४-सीअे-९७२२ चा ड्रायव्हर नसीम पीरमहंमद खान हा जेलमध्ये बंद असल्याकारणाने या केस प्रकरणाबाबत हजर राहू शकत नाही, असे नमूद केले आहे.

मे.अथेना ट्रेड विन्ड्स प्रा.लि. यांनी दिनांक १७/१०/२०११ रोजीच्या टपालामार्फत सादर केलेल्या निवेदनात, सदरचा वाटाण्याचा साठा हा आयात केलेला असून तो त्यांना माहे मे २०११ च्या अखेरीस प्राप्त झालेला

आहे. सदरचा साठ्याचे इम्पोर्ट कन्झायंटमेंटला कस्टम खात्याने मान्यता दिल्यानंतर तो सी.डब्लू.सी. वेअर हाऊस कॉटनग्रीन या ठिकाणी साठवणूक केलेला आहे. प्रचलित पध्दतीनुसार सदर साठ्याचे माहे मे ते सप्टेंबर २०११ या महिन्याचे मासिक विवरणपत्रही सादर केलेले आहे. आयात केलेल्या साठ्यापैकी त्यांनी पारख अग्रो इंडस्ट्रीज लि. यांना त्यांचे ब्रोकर मे. अमित कमर्शियल यांचेमार्फत विक्री केलेला आहे. दिनांक २०/०९/२०११ रोजी पारख अग्रो इंडस्ट्रिस लि. यांनी ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-४३९५ या ट्रकमधून २०० गोणी तसेच ट्रक क्रं. एमएच-०४-सीए-९७२२ या ट्रकमधून ३५० गोणी अनुक्रमे इन्वाईस क्र. २४८ व २४९ नुसार वटाण्याचा साठा खरेदी केल्याचे सांगितले. त्यानुसार त्यांना विक्री केलेल्या साठ्याचे पेमेंट मिळाले असून सदर घटनेची माहिती त्यांना यलोगेट पोसिल स्टेशन मार्फत दि.१३/१०/२०११ रोजी मिळालेली असून त्यासंबंधी त्यांनी दि.१७/१०/२०११ रोजी पोलिसांना निवेदन सादर केल्याचे नमूद केले आहे.

व्ही. अर्जुन, क्लिअरींग ॲण्ड फारवर्डींग एजंट यांनी दिनांक १८/१०/२०११ रोजीच्या टपालामार्फत सादर केलेल्या निवेदनात, ते मे.अथेना ट्रेड विन्ड्स प्रा.लि. यांचे सर्व्हिस प्रोव्हायडर म्हणून काम करीत असून त्यांचेकडे मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्याकडून मासिक भाडेतत्त्वावर वाटप झालेल्या जागेत आयात केलेल्या वटाण्याची साठवणूक करीत असल्याचे नमूद केले आहे.

मे.अथेना ट्रेड विन्ड्स प्रा.लि. यांनी दिनांक ०१/११/२०११ रोजीच्या टपालामार्फत मे. पारख अग्रो इंडस्ट्रिज लि. यांना विक्री केलेल्या साठ्याचे दि.२३/०७/२०११ ते २१/०९/२०११ पर्यंतचे तपशिलवार विवरणपत्र सादर केले.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक २०/०९/२०११ रोजी गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबईचे सहा. पोलिस आयुक्त, श्री. फिरोज पटेल यांना अशी माहिती मिळाली की, काही मोटार लॉरी चालक व इतर काही इसम हे सी. डब्ल्यू. सी. गोडावून कॉटनग्रीन, मुंबई येथे कॅनडा येथून आयात झालेला सफेद वटाणा हा ट्रकमध्ये भरुन तळोजा, नवी मुंबई येथे जात असताना वर नमूद विभागातील घोडपदेव क्रॉस रोड नं. ३ ई.एस.एल. पाटणवाला मार्ग, मुंबई २७ या ठिकाणी कुंदन नावाच्या इसमास ट्रकमध्ये भरलेल्या मालापैकी काही मालाचा अपहार करुन तो संगनमत करुन विक्री करतात. मिळालेल्या विश्वसनिय माहितीच्या अनुषंगाने गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई येथील पथक पंचासह पायी चालत क्रॉस रोड नं. ३, ई.एस.एल. पाटणवाला मार्ग, ग्लोबल पॅकर्स ॲण्ड मुव्हर्सच्या समोर रोडवर, मुंबई २७ या ठिकाणी रोडवर दोन मो/लॉरी क्र.एमएच-०४-जीपी-४३९५ व मो/लॉरी क्र.एमएच-०४-सीए-९७२२ उत्तरभिमुख

0009

असलेल्या मो/लॉऱ्याच्या चालकाच्या मदतीने काही इसम सफेद रंगाच्या प्लॅस्टिकच्या भरलेल्या गोणी खाली उतरवून बाजूस असणाऱ्या पत्राच्या शेडमध्ये ठेवत असताना दिसले. सदर गोडावून पश्चिमभिमुख दरवाज्यात एक इसम उभा असून तो सदरचा माल उतरवून घेऊन गोडावूनमध्ये असलेल्या इसमांस थप्पी लावून ठेवण्यास सांगत होता. सदरवेळी अधिकाऱ्यांनी त्यास त्याची कृती थांबविण्यास सांगून गोडावूनच्या दरवाज्याजवळ उभा असलेल्या इसम नामे कुंदन अशोक हुलावळे याने तो स्वत: गोडावूनचा मालक असल्याचे सांगितले. तसेच मो/लॉरी चालक हे मालामध्ये तफावत करुन काही वटाण्याने भरलेल्या गोण्या त्यास कमी भावाने स्वत:च्या फायद्यासाठी विकतात. त्याप्रमाणे सदरचा वाटाणा हा तो गोडावूनमध्ये साठा करुन बाजारात चढ्या भावाने विक्री करतो असे मान्य केल्याने तसेच त्याच्या सांगण्यावरुन ट्रकमधून वटाण्याच्या भरलेल्या गोण्या उतरुन घेऊन गोडावूनमध्ये ठेवत असलेल्या त्यांचे साक्षीदार इसम नामे चंद्रकांत गोविंद खापरे यास तसेच मो/लॉरी क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ मध्ये पाठीमागील फाळक्याच्या आत मध्ये उभा राहून वाटाणा गोणी उतरविणारा इसम नामे संदीप रामचंद्र कदम या सदर मो/लॉरीच्या चालकास, त्याचप्रमाणे वर नमूद मो/लॉरीच्या पाठीमागेच उभी असणारी मो/लॉरी क्र.एमएच-०४-सीअे-९७२२ चे पाठीमागील फाळक्याच्या आत उभ्या असलेल्या व वाटाण्याच्या गोणी उतरवून देण्याऱ्या इसम नामे नसीम पीरमंहमद खान या सदर लॉरीच्याा चालकास पोलिसांनी ताब्यात घेऊन एकत्र गोडावून समोर थांबवून ठेवले. सदर गोडावून व उभ्या असलेल्या रोडवरील मो/ट्रकची पाहाणी केली असता वाटाण्याच्या भरलेल्या एकावर एक रचून थप्पी लावून ठेवलेल्या गोण्या दिसून आल्या. पंचनाम्या अंतर्गत गोडावूनमधील मालाबाबत गोडावून मालक कुंदन अशोक हुलावळे यास वाटाणा साठवणूक केल्याबाबतचे परवाना व कागदपत्रे यांची विचारणा केली असता, त्याने कोणतीही कागदपत्रे नसल्याचे सांगितले. अशाप्रकारे संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन पांढरा वाटाणा भरलेल्या एकूण ६३७ पांढऱ्या रंगाच्या प्लॅस्टिकच्या गोण्या प्रत्येकी ५० किलो वजनाच्या एकूण ३१८५० किलो साठा, एक वजनकाटा, दोन मो/लॉरी असा एकूण २८,०३,२५०/- रुपये किमंतीचा मुद्देमाल पोलिसांकडून जप्त करण्यात आला.

सुनावणीस उपस्थित तपासी पोलिस अधिकारी यांनी केलेल्या खुलाशात, सदर गुन्ह्यात जप्त केलेला १४० गोणी सफेद वटाणापैकी ५३ गोणी मालचा अपहार झालेला आहे. गुन्ह्यात जप्त केलेल्या दोन्ही मो/लॉऱ्या व त्यामधील अपहार होवून शिल्लक राहिलेला माल एकूण ४९७ गोणी असून त्या मालाचे कागदपत्र संबंधितांकडे मिळून आल्याने सदरच्या लॉऱ्या व माल संबंधितांस परत करण्यास पोलिसांची हरकत नाही. एकूण ५३ गोणी अपहार झालेल्या असून त्या पारख ॲग्रो इंडस्ट्रीज कंपनीच्या मालकीच्या असल्याने त्या गोणी कंपनीस अथवा माल पाठविण्याऱ्या भोला ट्रान्सपोर्ट कंपनीस परत करण्यास पोलिसांची हरकत नाही. गुन्ह्यातील अटक आरोपी नामे कुंदन अशोक हुलावळे यांचे कब्जात मिळालेल्या ८७ गोणी व निवेदन पंचनाम्या अन्वये हस्तगत केलेल्या २६ गोणी

अशा एकूण ११३ गोणी बाबत कोणतेही कागदपत्र मिळून न आल्याने तसेच अपहार झाल्याची तक्रार संबंधितांकडून प्राप्त न झाल्याने तसेच सदरचा माल हा नाशवंत असल्याने त्याचे विल्हेवाटीच्या आदेशाबाबत विनंती केलेली आहे.

तसेच सर्व प्रतिवादी यांची गुन्ह्याच्या पुढील तपासाच्या अनुषंगाने पुराव्या करीता सविस्तर जबाब नोंद करण्यात आलेला आहे. सदर जबाबाच्या वेळी ते कार्यरत असलेल्या मे. अथेना ट्रेड विन्डस् प्रा. लि. सी ३१२, ३ रा माळा क्रिस्टल प्लाझा लोखंडवाडा अन्फीनेंट मॉलसमोर, लिंक रोड, अंधेरी (प), मुंबई -५४ या कंपनीने कॅनडा या देशातून सफेद वाटाणा आयात करीत असून तो भारतात गरजू कंपन्यांना बोर्कर्स् मार्फत विक्री करीत आहे. त्या प्रमाणे दि.२०/०९/२०११ रोजी त्यांचे बोर्कर अमित कमर्शियल कंपनी कॉटनग्रीन यांनी पारख अग्रो इंडस्ट्रीज प्रा.लि. तळोजा यांना दोन लॉरी मधून माल पाठविलेला होता. त्या मालाचे पेमेंट त्यांना दि.१०/१०/२०११ रोजी किंमत रुपये ६,१६,१५९/- धनादेश क्र. ००१९३३ चा त्यांच्या कंपनीच्या खात्यावर जमा झाला. म्हणून त्यांनी सदर बोर्कर मार्फत तळोजा येथील कंपनीस मालाची डिलव्हरी केली. सदर गुन्ह्यातील जप्त करण्यात आलेला माल हा यातील अटक आरोपीतांनी एकमेकांशी संगनमत करुन अपहार केलेला आहे. तसेच सदरचा माल हा नाशवंत असल्याकारणाने त्याचे विल्हेवाटीचे आदेश जारी होणेस विनंती केली आहे.

सुनावणीस उपस्थित मे. पारख अग्रो इंडस्ट्रिस लि. चे व्यवस्थापक विजय बी. गांधी यांनी केलेल्या खुलाशात, त्यांची तळोजा एल-७३, एमआयडीसी ह्या ठिकाणी वाटाणा दाल/पीठ बनविण्याची कंपनी असून त्यांचेकडील PDL/FDL चे अनुज्ञप्तीची छायांकित प्रत सादर केली आहे. त्यांनी दि.१५/०९/२०११ रोजी दलाल मे. अमीत कमर्शियल कं. ह्याच्या मार्फत मे. अथेना ट्रेडविंग्ज प्रा.लि. ह्याच्याशी ५० मे.ट. वाटाणाचा सौदा करुन त्यापैकी दि.२०/०९/२०११ रोजी ट्रक क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ मध्ये २०० गोणी व एमएच-०४-सीऔ-९७२२ मध्ये ३५० गोणी त्यांच्या नमूद ठिकाणी असलेल्या कंपनीकरिता भरला होता. सदर गाडीतील माल हा कंपनीच्या मालकीचा असल्याने त्यांना तो परत देण्यात यावा, असे नमूद केले आहे.

मे.अथेना ट्रेड विन्ड्स प्रा.लि. यांनी सादर केलेल्या खुलाशात, सदरचा वाटाण्याचा साठा हा आयात केलेला असून तो त्यांना माहे मे २०११ च्या अखेरीस प्राप्त झालेला आहे. सदरचा साठ्याचे इम्पोर्ट कन्झायंटमेंटला कस्टम खात्याने मान्यता दिल्यानंतर तो सी.डब्लू.सी. वेअर हाऊस कॉटनग्रीन या ठिकाणी साठवणूक केलेला आहे. प्रचलित पध्दतीनुसार सदर साठ्याचे माहे मे ते सप्टेंबर २०११ या महिन्याचे मासिक विवरणपत्रही सादर केलेले आहे. आयात केलेल्या साठ्यापैकी त्यांनी पारख अग्रो इंडस्ट्रीज लि. यांना त्यांचे ब्रोकर मे. अमित कमर्शियल यांचेमार्फत दिनांक २०/०९/२०११ रोजी पारख अग्रो इंडस्ट्रिस लि. यांना ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-४३९५ या ट्रकमधून २०० गोणी तसेच ट्रक क्र. एमएच-०४-सीए-९७२२ या ट्रकमधून ३५० गोणी अनुक्रमे इन्वाईस क्र. २४८ व २४९ नुसार वटाण्याचा साठा विक्री केल्याचे सांगितले, असे नमूद केले आहे.

प्रस्तूत प्रकरणी पोलिसांनी घटनास्थळी जप्त करण्यात आलेल्या ५० किलो क्षमतेच्या २०० वटाणाच्या गोणीपैकी १८० गोणी ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-४३९५ यामधील व उर्वरीत २० गोणी गोडावूनमधील, ५० किलो क्षमतेच्या ३५० वटाणाच्या गोणीपैकी ३१७ गोणी ट्रक क्र. एमएच-०४-सीए-९७२२ यामधील व उर्वरीत ३३ गोणी गोडावूनमधील साठा हा मे. पारख अग्रो इंडस्ट्रिस लि. यांच्या मालकीचा असल्याने व त्यांच्याकडे सदर व्यवसायाकरिता आवश्यक FDL/PDL चा परवाना असल्याने व त्यांनी सदरचा साठा मे.अथेना ट्रेड विन्ड्स प्रा.लि. यांच्याकडून खरेदी केल्याचा निष्पन्न झाल्याने, सदरचा एकूण ५५० गोणी वटाणाचा साठा साठा सदर साठ्याच्या मुल्याएवढ्या किंमतीचे क्षतीपूर्तीबंधपत्र पोलिसांनी घेऊन मे. पारख अॅग्रो इंडस्ट्रीज लि. यांच्या मालकास परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

कुंदन अशोक हुलावळे यांनी केलेल्या खुलाशात, तो एक सर्वसामान्य नागरीक असुन या प्रकरणाशी त्याचा काही एक संबंध नाही. सदरहू तो तेथे असलेल्या लाकडाच्या वखारीत गेला असता त्याला काही सुचना न करता सदर गुन्ह्याखाली अटक करण्यात आली. तरी त्याचा या गुन्ह्याशी काही एक संबंध नसल्याचे नमूद केले आहे. मो/लॉरी क्र. एमएच-०४-सीपी-४३९५ चे चालक संदिप रामचंद्र कदम यांनी केलेल्या खुलाशात, तो गाडी क्र. एमएच-०४-सीपी-४३९५ या गाडीचा चालक असून सदर गुन्ह्यात त्याला सीबी कंट्रोल (गुन्हे शाखा) यांनी अटक केली आहे. परंतू त्याचा या गुन्ह्याशी काहीही संबंध नसल्याचे नमूद केले आहे. चंद्रकांत गोविंद खापरे यांनी केलेल्या खुलाशात, तो एक सर्वसामान्य नागरीक असून या प्रकरणाशी त्याचा काही एक संबंध नाही. सदरहू तो तेथे असलेल्या लाकडाच्या वखारीत काम करतो. ते वखारीसमोर उभा असतांना सदर गुन्ह्यात त्याला काही एक सुचना न देता पकडण्यात आले. त्याचा या गुन्ह्याशी काही एक संबंध नसल्याचे नमूद केले आहे. मो/लॉरी क्र.एमएच-०४-सीए-९७२२ चे मालक योगेश शिवाजी ताटे यांनी केलेल्या खुलाशात त्याच्या गाडी क्र.एमएच-०४-सीए-९७२२ चा ड्रायव्हर नसीम पीरमहंमद खान हा जेलमध्ये बंद असल्याकारणाने या केस प्रकरणाबाबत हजर राहू शकत नसल्याचे नमूद केले आहे.

परंतु घटनास्थळी दिलेल्या जबाबामध्ये गोडाऊनचे मालक कुंदन अशोक हुलावळे यांनी सांगीतले की, नमुद ट्रकचे चालक हे मालामध्ये तफावत करुन काही वाटाण्यांनी भरलेल्या गोण्या त्यांना कमी भावाने स्वतःच्या फायद्यासाठी विकतात तसेच सदरचा वाटाणा कुदन अशोक हुलावळे हे त्यांच्या गोडाऊनमध्ये साठा करुन बाजारात चढ्या भावाने विक्री करत असल्याचे मान्य केले आहे. तसेच त्यांच्या सांगण्यावरुन वाटाण्याच्या भरलेल्या गोण्या त्यांचे साथीदार इसम नामे चंद्रकांत गोविंद खापरे, मो/लॉरी क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ चे चालक संदिप रामचंद्र कदम व गाडी क्र.एमएच-०४-सीए-९७२२ चा ड्रायव्हर नसीम पीरमहंमद खान हे त्यांना घटनास्थळी ट्रकमधून वाटाण्याच्या गोण्या उतरवून गोडावूनमध्ये ठेवण्यास मदतनीस म्हणून काम करीत असल्याचे सांगीतले आहे.

सबब, गोडाऊनचा मालक कुदंन अशोक हुलावळे यांनी त्यांच्या इतर साथीदारांसोबत अवैधरित्या वाटाण्याचा साठा करुन तो चढ्याभावाने विक्री करण्याचे तसेच त्यांच्याकडून मिळालेल्या गोंडाऊनमधील ८७ गोणी व पोलिसांच्या निवेदन पंचनाम्याअन्वये हस्तगत केलेल्या २६ गोणी अशा एकूण ११३ गोणी वाटाण्याच्या साठ्याबाबत कोणतेही कागदपत्र मिळून न आल्याने तसेच अपहार झाल्याची तक्रार संबंधीतांकडून प्राप्त झाल्याने सदरचा एकूण ११३ गोणी वाटाण्याचा साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेले मो/लॉरी क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ चे मालक अन्सार अहमद अब्दुल नबी कुरेशी यांनी केलेल्या खुलाशात ते ट्रान्सपोर्टर असून त्याची गाडी क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ या गुन्ह्याखाली पकडण्यात आली आहे. त्याचा पारख अग्रो या कंपनी सोबत वाहतूक करणेचा करार झाला असून त्या नुसार तो त्याचा व्यवसाय करीत आहे. सदर गुन्ह्याशी त्याचा प्रत्यक्ष संबंध नसून केवळ वाहतुकीकरीता त्याचा ट्रक उपलब्ध असल्यामुळे सदर गुन्ह्यात समावेश करण्यात आलेला आहे. तरी त्याचा वरील नमूद केलेला ट्रक मुक्त करण्यास विनंती केली आहे. तसेच मो/लॉरी क्र.एमएच-०४-सीअे-९७२२ चे मालक योगेश शिवाजी ताटे यांनी केलेल्या खुलाशात ते ट्रान्सपोर्टर असून त्याची गाडी क्र. एमएच-०४-सीअे-९७२२ या गुन्ह्याखाली पकडण्यात आली आहे. त्याचा पारख अग्रो या कंपनी सोबत वाहतूक करणेचा करार झाला असून त्या नुसार तो त्याचा व्यवसाय करीत आहे. सदर गुन्ह्याशी त्याचा प्रत्यक्ष संबंध नसून केवळ वाहतुकीकरीता त्याचा ट्रक उपलब्ध असल्यामुळे सदर गुन्ह्यात समावेश करण्यात आलेला आहे. तरी त्याचा वरील नमूद केलेला ट्रक मुक्त करण्यास विनंती केली आहे.

तथापि, ट्रक क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ चे चालक संदिप रामचंद्र कदम व ट्रक क्र. एमएच-०४-सीअे-९७२२ चे चालक नसीम पीरमहंमद खान यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबावरुन त्यांनी गोडाऊनचे मालक कुंदन अशोक हुलावळे यांनी आपआपसात संगनमत करुन सदर दोन्ही ट्रकचा गैरवापर केला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. तसेच जप्त केलेल्या दोन्ही ट्रकमधील एकूण ५५० वटाण्याच्या गोंणींव्यतीरीक्त गोडावून मध्ये आढळून आलेल्या ११३ वटाण्याच्या गोणी पहाता नमुद आरोपी संगनमताने गैरकृत्य करत असल्याचे दिसून येते.

उपरोक्त ट्रक क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ चे मालक अन्सार अहमद अब्दुल नबी कुरेशी व ट्रक क्र. .एमएच-०४-सीअे-९७२२ चे मालक योगेश शिवाजी ताटे यांनी दिलेल्या निवेदनावरुन ते मे. पारख ॲग्रो इंडस्ट्रीज यांचे वाहतुकदार असले तसेच त्यांच्या अपरोक्ष जरी आरोपी यांनी त्यांच्या वाहनाचा गैरवापर केला असला तरी, वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांच्या ट्रक मध्ये भरलेला वटाण्याचा साठा हा नियोजीत ठिकाणी पोहचविण्याची जबाबदारी त्यांची असून त्यांच्या वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वतोपरी दक्षता त्यांनी घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ) (क) मधील तरतुदीनुसार सदरचे जप्त करण्यात आलेले ट्रक क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ व ट्रक क्र. .एमएच-०४-सीअे-९७२२ हे त्यांच्या बाजारमुल्याएवढी रक्कम

CONTROLLER ... RATIONING ... HEAD

भरण्यास ट्रकचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे दोन्ही ट्रक त्यांच्या मालकास परत करण्याच्या अथवा ट्रकचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या दोन्ही ट्रकचे जाहिर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापि अशी कार्यवाही करण्यापूर्वी दोन्ही ट्रकच्या मालकीबाबत परिवाहन विभागाच्या अभिलेख्यांची पोलिसानी खातरजमा करावी.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून सदर गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विंवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये भायखळा पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १९९/२०११, दि.२१/०९/२०११ (गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १३/२०११) मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

आदेश :-

१) प्रस्तूत प्रकरणी पोलिसांनी घटनास्थळी जप्त करण्यात आलेल्या ५० किलो क्षमतेच्या २०० वटाणाच्या गोणीपैकी ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-४३९५ यामधील १८० गोणी व त्याच ट्रक मधील गोडावूनमध्ये उतरवीलेल्या उर्वरीत २० गोणी तसेच ५० किलो क्षमतेच्या ३५० वटाणाच्या गोणीपैकी ट्रक क्र. एमएच-०४-सीए-९७२२ यामधील ३१७ गोणी व त्याच ट्रक मधील गोडावूनमध्ये उतरवीलेल्या उर्वरीत ३३ गोणी वाटाण्याचा साठा असा एकूण ५५० गोणी वाटाण्याचा साठा हा मे. पारख अग्रो इंडस्ट्रिस लि. यांच्या मालकास त्याच्या मुल्याएवढ्या किंमतीचे क्षतीपूर्तीबंधपत्र पोलिसांनी घेऊन परत करण्यात यावा.

२) गोडाऊन मधील अवैधरित्या साठवणूक केलेला ५० किलो क्षमतेचा ८७ गोणी व पोलिसांच्या निवेदन पंचनाम्याअन्वये हस्तगत केलेल्या ५० किलो क्षमतेच्या २६ गोणी अशा एकूण ११३ गोणी वाटाण्याचा साठा शासनजमा करण्यात यावा व सदरचा साठा पोलिसांनी वैध परवानाधारकास प्रचलीत दराने विक्री करुन येणारी रक्क शासन जमा करावी.

३) जप्त करण्यात आलेले ट्रक क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ व ट्रक क्र. .एमएच-०४-सीअे-९७२२ हे शासन जमा करण्यात येत आहे. सदर दोन्ही ट्रक त्यांच्या बाजार मुल्याएवढी रक्कम भरण्यास ट्रकचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे दोन्ही ट्रक त्यांच्या मालकास परत करण्यात यावेत व येणारी रक्कम शासनजमा करावी. अशी कार्यवाही करण्यापूर्वी मो/लॉरीच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी. अथवा ट्रकचे मालक सदरची

रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहिर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासन जमा करावी. तथापि, सदरचे ट्रक लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचित करावे.

४) घटनास्थळी जप्त करण्यात आलेला जूना वापरता लाल रंगाचा वेगवेगळ्या मापाच्या वजनांसहीत वजनकाटा इत्यादी वस्तू शासन जमा करण्यात यावी. सदर वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलिसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) कुंदन अशोक हुलावळे
२) चंद्रकांत गोविंद खापरे
३) मो/लॉरी क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ चे चालक, संदीप रामचंद्र कदम
४) मो/लॉरी क्र. एमएच-०४-जीपी-४३९५ चे मालक
५) मो/लॉरी क्र.एमएच-०४-सीअे-९७२२ चे चालक, नसीम पीरमंहमद खान
६) मो/लॉरी क्र.एमएच-०४-सीअे-९७२२ चे मालक
७) मे. अमीत कमर्शियल कंपनीचे मालक
८) प्रकाश अग्रो इंडस्ट्रीज तलोजा, नवी मुंबई चे मालक
९) मे.अथेना ट्रेड विन्ड्स प्रा.लि., सी-३१२, तिसरा मजला, क्रिस्टल प्लाझा, इनफीनिटी मॉलसमोर, मुंबई
१०) व्यवस्थापक, सी. डब्ल्यू. सी. गोडावून, कॉटनग्रीन, मुंबई
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि., मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि., मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई